# समिती दर्पण

**नोव्हेंबर २०२४**

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org


### समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाकडे पहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्च शिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्य सेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरुवात झाली. आज समितीची पुण्यात सात आणि नगरमध्ये एक अशी आठ वसतिगृहे आहेत. त्यात सुमारे ११०० विद्यार्थी -विद्यार्थिनींची निवास-भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर समितीचे काम चालते.

# नऊ रसांच्या नऊ स्वरधुनीत नाहले श्रोतेजन

## समितीचे देणगीदार, हितचिंतकांनी लुटला 'गीत रामायणा'चा आनंद

गेली ७० दशके मराठी रसिकांच्या मनावर गारूड केलेल्या 'गीत रामायणा'चा आनंद २२ नोव्हेंबर रोजी समितीचे देणगीदार आणि हितचिंतकांनी लुटला. ग. दि. माडगूळकर यांनी रचलेली आणि सुधीर फडके यांनी संगीतसाज चढविलेली ही अजरामर कलाकृती श्रीधर फडके यांच्या मुखातून ऐकताना

**सात स्वरांच्या स्वर्गामधुनी**
**नऊ रसांच्या नऊ स्वरधुनी**
**यज्ञमंडपी आल्या उतरुनी**
**संगमी श्रोतेजन नाहती**

या ओळींचाच जणू प्रत्यय आला.

निमित्त होते विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वतीने देणगीदार आणि हितचिंतकांसाठी आयोजित सांगितिक कार्यक्रमाचे. टिळक स्मारक मंदिरात रसिकांच्या भरगच्च उपस्थितीत हा 'गीत रामायण' कार्यक्रम झाला. समितीच्या विश्वस्त सुप्रिया केळवकर यांनी प्रास्ताविकात समितीच्या कार्याची माहिती दिली.

'कुश - लव रामायण गाती'पासून 'गा बाळांनो श्रीरामायण'पर्यंत गीतांच्या माध्यमातून रामकथा उलगडत असताना गीत रामायणाशी संबंधित अनेक आठवणी श्रीधर फडके यांनी सांगितल्या. गीतांतील प्रसंगाशी समरस होत केलेले गायन, राम जन्मला, स्वयंवर झाले सीतेचे, सेतू बांधा रे सागरी या गीतांना रसिकांनी उत्स्फूर्तपणे दिलेला कोरस यामुळे अवघे वातावरण राममय होऊन गेले. सुकन्या जोशी, अभिजित मोडक यांनी ओघवत्या निवेदनातून रामकथा गुंफली, तुषार आंग्रे, ओंकार पाटणकर, प्रणव कुलकर्णी, उद्धव कुंभार यांनी वाद्यांची तर रश्मी भंडारी, गौरी सनगळ, योगेश पीतांबरे यांनी सुरांची साथसंगत केली.




या कार्यक्रमात पेढा आणि चाफ्याचे फूल देऊन प्रत्येक रसिकाचे स्वागत करण्यात आले. गीत रामायणातील गदिमांचे शब्द, बाबूजींचे संगीत, श्रीधर फडके यांचा आवाज यामुळे राममय झालेले वातावरण चाफ्याच्या फुलांमुळे अधिक चैतन्यमय आणि सुगंधित झाले.

### पुत्र सांगती चरित पित्याचे...

- आकाशवाणीवर तसेच कार्यक्रमांमध्ये प्रत्यक्ष सुधीर फडके यांनी गायिलेले गीत रामायण ऐकलेले अनेक ज्येष्ठ रसिक कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यांना गदिमांच्या 'पुत्र सांगती चरित पित्याचे' या शब्दांची अनुभूती यावेळी आली.

ग्रामीण भागातून उच्च शिक्षणासाठी पुण्यात आलेल्या मुलामुलींसाठी विद्यार्थी साहाय्यक समिती मोठा आधार आहे. समितीच्या कार्यात देणगीदार, हितचिंतकांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दरवर्षी सांगितिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतो.

**- प्रतापराव पवार, अध्यक्ष**

# 'पाल्य- पालक'मधून मिळाला जिवाभावाचा भाऊ



**ग्रामीण भागातील, गरीब कुटुंबातील विद्यार्थी-विद्यार्थिनींमध्ये पुण्यात आल्यानंतर कॉलेजमधील मुलामुलींचे राहणीमान, भाषा पाहून न्यूनगंड निर्माण होण्याची, तसेच घरच्या आठवणीने नैराश्य येण्याची भीती असते. हे टाळण्यासाठी शहरात या मुलांना एक घर, एक कुटुंब देण्याच्या उद्देशाने पाल्य- पालक योजना राबविण्यात येते. या योजनेतून अनेक मुलेमुली शहरातील कुटुंबाशी कायमस्वरुपी जोडले गेले आहेत. अशाच नात्याविषयी माजी विद्यार्थिनीने लिहिलेले मनोगत...**

**सुलेखा अनंत आंबेकर** (पूर्वाश्रमीची सुलेखा जोशी),
माजी विद्यार्थिनी, निवृत्त प्राथमिक शिक्षिका

माझे वडील लष्करात होते. त्यावेळी आम्ही उत्तर प्रदेशात बरेली येथे राहात होतो. उच्च शिक्षणासाठी मला पुण्यात जायचे होते. वडिलांचीही तशी इच्छा होती. मला पुण्यात फर्ग्युसन कॉलेजमध्ये तसेच तेथील होस्टेलमध्येही प्रवेश मिळाला. आम्ही होस्टेलचे रेक्टर प्रा. कारेकर यांना भेटायला गेलो. त्यांनी वडिलांची चौकशी केली. पगार वगैरे विचारला. त्यावेळी वडिलांना पगार कमी होता. तेव्हा प्रा. कारेकर यांनी स्वतःच्या कारमधून आम्हाला विद्यार्थी साहाय्यक समितीत नेले. तेथे मला प्रवेशही मिळाला.

समितीच्या पाल्य- पालक योजनेत मला ढवळेताई पालक म्हणून मिळाल्या. त्या पुणे विद्यापीठाच्या ग्रंथालयात ग्रंथपाल होत्या. मला लागणारी पुस्तके त्या स्वतःच्या नावावर घेऊन द्यायच्या. अभ्यास कर, असे ठासून सांगायच्या. त्यात एक आपलेपणा असायचा. माझ्या एका वाढदिवसाला त्यांनी मला Black stallion हा सिनेमा पण दाखवला. त्यानंतर हॉटेलमध्ये जेवणही दिले.

सन १९८० मध्ये दिवाळीच्या सुटीनंतर लगेच परीक्षा असल्याने मी घरी गेले नाही. समितीच्या होस्टेलमध्ये एकटीच होते. पर्यवेक्षक पाटकरताईंनी मला बोलावून घेतले आणि श्री. व सौ. गोगटे यांची ओळख करून दिली. उभयतांचा त्यावेळचा हसतमुख चेहरा मी विसरणार नाही. त्यांना एक बहीण हवी होती. त्यावेळी मी एकटीच होस्टेलवर असल्याने ताईंनी मला विचारले, 'जाणार का दिवाळीत चारपाच दिवस यांच्याकडे राहायला?' काहीही ओळख, माहिती नसताना मी 'हो' म्हणाले. त्यांच्या हसतमुख चेहऱ्याने मला पाहताक्षणी आपलेसे केले होते.

मी गोगटे यांच्या घरी गेले. त्यांची दोन मुले मनीषा व अवधूत. 'आत्या आलीय तुमची,' अशी त्यांनी माझी त्यांच्याशी ओळख करून दिली. मुले खूष झाली. दिवाळी झाली. भाऊबीज झाली. त्यानंतर मी हक्काने त्यांच्या घरी जायला लागले.

मी ग्रॅज्युएट झाले. माझे कुटुंब पुण्यात आले. गोगटे दांपत्याशी आईबाबांची ओळख झाली. घरोबा वाढला. मी होस्टेलवर असतानाच्या वहिनी गर्भवती होत्या. मी दादांना म्हटले, लोकर आणून द्याल का, बाळाला स्वेटर विणून देते. दादांनी पैसे दिले. मी स्वेटर विणला. बारशाला सर्वांना सांगत होते, माझ्या बहिणीने विणला आहे स्वेटर. मोठ्या मुलाच्या मुंजीच्यावेळी वहिनी पाटकरताईंना सांगून साऱखे मला बोलवून घ्यायच्या. मुंजीच्या दिवशी तर आहेर, इतर सामान सगळे मला दाखवून कार्यालयातील कोठीच्या खोलीची चावी माझ्याकडे दिली. नातेवाइकांनी ही कोण, असे विचारले, तर दादा सांगायचे माझी बहीण. कोणाला काय आहेर द्यायचे, ते मी आणून द्यायची. माझ्या या कामावर वहिनी खूष झाल्या होत्या. त्या मला नाटकासाठी वेळोवेळी साड्यांची मदत करायच्या. माझ्या लग्नातसुद्धा खूप मदत केली. आचाऱ्यापासून कार्यालय बुकिंगपर्यंत सर्व काही त्यांनी केले.

गेल्या ४० वर्षांचे हे जिवाभावाचे नाते. समितीमुळे निर्माण झालेले. समितीचे हे ऋण मी केव्हाच विसरू शकत नाही.




*सुलेखा व त्यांच्या पतीसह गोगटे दांपत्य (मागे उभे)*



*श्री. गोगटे यांच्यासह सुलेखा आंबेकर*



# विद्यापीठ निबंध स्पर्धेत सुशील पुरीचे यश

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे योजनेच्या वर्धापन दिनानिमित्त विद्यापीठस्तरीय सांस्कृतिक व साहित्यिक स्पर्धा आयोजित केल्या होत्या. त्यातील मराठी निबंध स्पर्धेत समितीतील विद्यार्थी सुशील राजेंद्रकुमार पुरी याने तृतीय क्रमांक पटकावला.

विविध आठ प्रकारच्या स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. यावेळी प्रकुलगुरू डॉ. पराग काळकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सदानंद भोसले, एमएनजीएलच्या संचालिका सौ. भाग्यश्री मंठाळकर, श्री. रवींद्र शिंगणापुरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

मराठी निबंध स्पर्धेत सुशील पुरी याने 'ताणतणाव व्यवस्थापनामध्ये कुटुंबाची व समाजाची भूमिका' या विषयावर निबंधाच्या माध्यमातून विचार मांडले.

पारितोषिक वितरण कार्यक्रमात 'शब्दामृत' या मागील वर्षीच्या विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या कवितांच्या संग्रहाचे प्रकाशन करण्यात आले.

# एनडीए भेटीने विद्यार्थ्यांना मिळाली देशभक्तीची प्रेरणा

विद्यार्थ्यांना राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीतील (एनडीए) शिस्तबद्ध जीवनशैलीचा आणि संरक्षण क्षेत्रातील कठोर प्रशिक्षणाचा अनुभव देण्याच्या उद्देशाने आयोजित केलेल्या शैक्षणिक सहलीत समितीतील १२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. पर्यवेक्षक सविता भुक्ते यांच्या मार्गदर्शनाखाली २६ नोव्हेंबर रोजी या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय परेडचा अविस्मरणीय अनुभव घेतला.

पहाटे साडेचार वाजता सर्व विद्यार्थी डॉ. आपटे वसतिगृहातून निघाले. एनडीएच्या प्रवेशद्वाराजवळ पोहोचल्यावरच सुरक्षा व नियोजनाची झलक दिसली, ज्यामुळे सर्व जण भारावून गेले. सकाळी साडेसातला परेड सुरू झाली. परेडदरम्यान कॅडेट्सच्या शिस्तबद्ध हालचाली, चालण्यातील एकसंघपणा आणि आत्मविश्वासाने परिपूर्ण चेहरे पाहून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली. एअर शो हा विशेष आकर्षणाचा भाग ठरला. विमानांच्या आकाशातील मोहक रचना विद्यार्थ्यांना पाहायला मिळाल्या. एनडीएतील शिस्तबद्ध जीवन, विशाल परिसर, आणि कठोर प्रशिक्षण पाहून विद्यार्थी प्रेरित झाले. कार्यक्रमाच्या दरम्यान शिस्त, समर्पण आणि देशसेवेच्या मूल्यांची खरी ओळख विद्यार्थ्यांना झाली. या अनुभवानंतर काही विद्यार्थ्यांनी संरक्षण क्षेत्रात करिअर करण्याची इच्छा व्यक्त केली. ही भेट केवळ शैक्षणिक नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठीही महत्त्वाची ठरली.





# नवा अनुभव

## समिती व्यवस्थापन पाहून प्राध्यापक प्रेरित

**महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास प्रबोधिनीच्या माध्यमातून राज्यभरातील प्राध्यापकांची कार्यशाळा २५ नोव्हेंबर रोजी विद्यार्थी साहाय्यक समितीच्या लजपत वसतिगृहात झाली. या कार्यशाळेत ३० प्राध्यापकांनी सहभाग घेतला. या कार्यशाळेविषयी...**

महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास प्रबोधिनी ही राज्याच्या शैक्षणिक क्षेत्रात काम करणारी स्वतंत्र संस्था आहे. महाविद्यालयीन शिक्षकांना प्रशिक्षण देऊन त्यांचा दर्जा उंचावण्याचे काम ही संस्था करते. राज्याचे माजी शिक्षण आयुक्त विशाल सोळंकी आणि आयुक्त डॉ. विनय निपुण यांच्या माध्यमातून ही संस्था विद्यार्थी साहाय्यक समितीशी जोडली गेली. सोळंकी आणि डॉ. निपुण यांच्या समिती भेटीतून हा विचार मांडला गेला, की उच्च शिक्षणासाठी खेड्यापाड्यातून आलेल्या गरजू आणि होतकरू मुलामुलांसाठी विद्यार्थी साहाय्यक समिती गेली सहा दशके वसतिगृहे कशी आदर्शवत चालत आहेत, समता, स्वच्छता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर युवा परिवर्तन आणि सक्षमीकरणाचे काम कसे अखंडपणे चालले आहे, याचा अनुभव शिक्षकांनी घ्यावा, विद्यार्थ्यांकडून वसतिगृहांचे व्यवस्थापन हा अनोखा प्रयोग त्यांनी पाहावा, या उद्देशाने कार्यशाळेचे आयोजन समितीत करावे. असे प्रारुप दुर्लक्षित अशा सरकारी वसतिगृहांसाठी प्रेरणादायक ठरू शकते, असाही विचार या मागे होता. अध्यापक विकास प्रबोधिनीतील समितीचे माजी विद्यार्थी गणेश ननावरे आणि संपर्क अधिकारी मिथिलेश बाकरे यांच्या पाठपुराव्यातून या कार्यशाळेचे आयोजन झाले.

कार्यशाळेत समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, मुख्य विकास अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी, कार्यकर्ते प्रभाकर पाटील यांच्यासह माझा सहभाग होता. यात समितीची कार्यपद्धती व विविध योजना, उपक्रमांची माहिती देण्यात आली. प्रश्नोत्तरांतून उपस्थित प्राध्यापकांशी संवाद साधला. तीन तासांच्या या कार्यशाळेला प्राध्यापकांचाही मोठा प्रतिसाद लाभला. समितीचे मुलांच्या विकासातून युवा परिवर्तनाचे काम ऐकून आणि नंतर मुलींच्या नव्या वसतिगृहाला भेट देऊन आम्हाला नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळाली, अशी प्रतिक्रिया या प्राध्यापकांनी व्यक्त केली.

**- सुप्रिया केळवकर**

### समितीत विद्यार्थ्यांच्या शिक्षणप्रवासाला नवी दिशा



कार्यशाळेच्या निमित्ताने विद्यार्थी साहाय्यक समितीला भेट दिली. या संस्थेच्या कार्यप्रणालीचे निरीक्षण करताना त्यांची विद्यार्थ्यांसाठी असलेली तळमळ व सेवाभाव प्रकर्षाने जाणवला. विद्यार्थ्यांना वसतिगृह, भोजन, वाचनालय आणि इतर शैक्षणिक सुविधा कमी खर्चात उपलब्ध करून देण्याचे त्यांचे कार्य कौतुकास्पद आहे.

या संस्थेने अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवासात नवी दिशा दिली आहे. सामाजिक बांधिलकी आणि सामूहिक सहकार्यातून समाज परिवर्तन शक्य आहे, हे त्यांनी दाखवून दिले. महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास प्रबोधिनीच्या पुढाकाराने अशा संस्थेच्या कार्याचा अनुभव घेता आला, याबद्दल विशेष आनंद व समाधान वाटते.

**- प्रा. सौ. ज्योती शांताराम काळेल**
मुधोजी महाविद्यालय, फलटण

# दिवाळी निधी संकलनातून जागते समाजभान

**विद्यार्थी साहाय्यक समितीचे कार्य समाजाच्या मदतीवर सुरू आहे. निधी संकलन किती जिकिरीचे आहे, त्याचबरोबर संस्थेच्या कार्यात आपणही खारीचा वाटा उचलला पाहिजे, याची जाणीव विद्यार्थ्यांना व्हावी, यासाठी दिवाळी निधी संकलन हा उपक्रम दरवर्षी राबविला जातो. निधी संकलनादरम्यान विद्यार्थ्यांना आलेले अनुभव...**

### समितीचे नाव ऐकताच मिळाला निधी



दिवाळी निधी संकलन उपक्रमामुळे मला अनेक नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या. बाहेरच्या जगात वावरण्याचा, नवीन व्यक्तींना भेटण्याचा, त्यांच्याशी संवाद साधण्याचा अनुभव मिळाला. दिवाळी निधी मागितल्यानंतर अनेकांनी समितीबद्दल सखोल माहिती विचारली. समितीची माहिती सांगताना खूप आनंद आणि अभिमान वाटला. काही जणांनी तर समितीचे नाव ऐकताच, लगेचच दिवाळी निधी दिला.

मी पूर्वी ज्या होस्टेलमध्ये गेले होते, तेथेही जाऊन मी समितीची माहिती दिली. तेथील अधिक्षिकांनीही दिवाळी निधीसाठी रक्कम दिली. मी जेथे शिकले, त्या शाळेतही गेले. तेथेही चांगला अनुभव आला. एसएनडीटी कॉलेजमधील शिक्षकांनीही मला मदत केली.

**- साक्षी स्वामी,** डॉ. अ. शं. आपटे वसतिगृह

### आत्याने आनंदाने स्वीकारली पावती



दिवाळी निधी संकलन अभियानाचा उद्देश हा या ज्ञानछत्राला जगासमोर आणण्याचा असून यातून असंख्य नियोजित बाबी विद्यार्थी साहाय्यक समिती पूर्ण करत आहे. आपण शिक्षकी पेशातून लोककल्याणकारी समाजभान तयार करू शकतो, असे स्वप्न माझे मामा कै. नवनाथ पुरी यांनी बघितले होते. दुर्दैवाने आज ते आपल्यात नाहीत.

मी माझ्या आत्याला भेटायला गेलो, तेव्हा समितीची माहिती सांगितली, तिला एक पावती दिली. आत्याने आनंदाने ती पावती स्वीकारली. समोर भिंतीवर असलेला मामांचा फोटो मी दुरूनच न्याहाळत होतो. आयुष्यात त्यांनी अनेकांना मदत केली. त्यांच्या एका हातात आयुष्यभर कमवलेली माणसे होती नि दुसऱ्या हातात कमवलेल्या माणसांसाठी सक्रिय भावनेने केलेली मदत होती.

**- सुशील मेघना राजेंद्रकुमार पुरी,** हरिभाऊ फाटक वसतिगृह

### भलाईच्या कामासाठी भेटली भली माणसे



दिवाळी निधी संकलनाच्या निमित्ताने मी नवीन लोकांना भेटले. मला सुरुवातीला प्रश्न पडला, पैसे मागायचे कसे? आत्मविश्वास एकवटून पहिला प्रयत्न केला आणि निधी मिळालासुद्धा. शेवटच्या पावतीपर्यंत माझा आत्मविश्वास आणखी वाढला. समितीची माहिती देताना प्रत्येकवेळी अभिमानच वाटत होता. मी काही दिवसांपूर्वी श्री. प्रतापराव पवार यांचे 'अनुभवे आले' हे पुस्तक वाचले होते. समितीत येणाऱ्या गरजू मुलामुलींसाठी ते कोटींच्या देणग्या आणतात, मग आपण एवढे निधीपुस्तक तर नक्कीच पूर्ण करू शकतो आणि ते केलेसुद्धा. एक नक्की आहे, की जगात चांगले, भलाईचे काम केले तर तुम्हाला भेटणारी माणसेही भलीच असतात. मला आमच्या कॉलेजमधील शिक्षकांनी तसेच इतर कर्मचाऱ्यांनी निधीपुस्तक पूर्ण करायला खूप मदत केली. काही शिक्षकांनी इतक्या कमी वयात सामाजिक कार्य करते म्हणून शाबासकीही दिली. हा अनुभव माझ्यासाठी अविस्मरणीय आहे.

**- प्रतीक्षा हांडगर,** डॉ. अ. शं. आपटे वसतिगृह

### माणसे ओळखायला शिकले



निधी पुस्तक ही संकल्पना ऐकल्यावर डोक्यात एकच विचार आला होता, की घरच्यांकडून दोन हजार रुपये घेऊन सगळ्या पावत्या फाडायच्या. कारण काही सिनीयरकडून ऐकले होते की, बाहेरचे लोक पैसे देत नाही. आपण काय म्हणतोय, हे ऐकूनही घेत नाहीत.

निधी पुस्तक हातात आल्यावर वाटले की किमान एखाद्याकडे प्रयत्न तर करून पाहू. निधी संकलन आपल्या गावामध्ये जाऊन करायचे होते. पण मी मुद्दाम फर्ग्युसन रोडपासून सुरुवात केली. पहिल्या काही पावत्या तर त्याच रस्त्यावरील दुकाने, हॉटेलमध्ये फाडल्या. माझा आत्मविश्वास वाढला. अर्थात काही ठिकाणी दरवाज्यातूनच परत पाठवले. पण मी प्रयत्न सोडला नाही. साधे दोन हजार रुपये जमवायला एवढा त्रास होतोय. मग आम्ही एवढ्या कमी फीमध्ये शिवाजीनगरसारख्या पॉश एरियात राहतो, जिथे बाहेर फक्त राहाण्यासाठीचा खर्च महिन्याला पंधरा हजार रुपये आहे. खाण्यापिण्याचे वेगळेच पैसे लागतात. समितीत आहार, निवासाबरोबरच व्यक्तिमत्त्व विकासासाठी वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. या सगळ्यांसाठी निधी देणगीद्वारे कार्यकर्ते कसे जमा करत असतील, याची जाणीव झाली. असे वाटायचे, लोक देत असतील पैसे आमच्यासारख्या होतकरू विद्यार्थ्यांसाठी. पण ज्यावेळी स्वतः पैसे मागायला सुरुवात केली, तेव्हा समजले की लोक १०० रुपये देण्यासाठीही काचकुच करतात. समितीची व्यवस्थित माहिती दिली, तरी अविश्वास दाखवितात. उलटसुलट प्रश्न विचारतात. या सगळ्यांत मी माणसांची पारख करायला शिकले. कोण आपले ऐकून घेऊन पैसे देईल, कोण देणार नाही, हे ओळखता येऊ लागले. अनेकांनी हातातले निधी पुस्तक पाहूनच दरवाजा बंद केला. अशावेळी Convincing Power वापरली. हे कौशल्यही माझ्यामध्ये विकसित झाले.

पुण्यातल्या अनुभवातून एक लक्षात आले आणि त्याविषयी खंतही वाटली, की समितीबद्दल शहरातील लोकांना जास्त माहिती नाही. तुलनेने गावातील लोकांना जास्त माहिती आहे. फर्ग्युसन रस्त्यावर अनेकांनी मला, हे पुण्यातच आहे का? कुठे आहे? असे प्रश्न विचारले.

पुढच्या दिवाळीत मी अधिक रक्कम आणण्याचा प्रयत्न करेन आणि समितीबद्दल नेहमी ऋणी राहेन, भविष्यात मी समितीतील किमान एका मुलाचे पालकत्व स्वीकारीन.

**- प्रेरणा सुरेश मालुसरे,** डॉ. डॉ. अ. शं. आपटे वसतिगृह